नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २७४ | Issue - 274 | वार सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ | Blow- Monday Date 23 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# जनसामान्यांना दिलासा देणारा आणि आर्थिक शिस्त राखणारा अर्थसंकल्प सादर करण्याचा प्रयत्न करणार : मुख्यमंत्री फडणवीस

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात १५ विधेयके मांडणार; दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुचविलेले मुद्दे व सूचनांचा समावेश करणार

**अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापान कार्यक्रम**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, दि. २२ – राज्याच्या येत्या अर्थसंकल्पामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अपेक्षित असलेले सर्व मुद्दे, सूचना अंतर्भूत करण्यात येतील. तसेच जनसामान्यांना दिलासा देत असताना आर्थिक शिस्त देखील पाळली जाईल यासाठी काही कडक पावलेही उचलायची आवश्यकता वाटल्यास उचलली जातील. जनसामान्यांना दिलासा देणारा आणि आर्थिक शिस्त राखणारा अर्थसंकल्प सादर केला जाईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या अर्थसंकल्पिय अधिवेशनात १५ विधेयके मांडण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पिय अधिवेशन उद्या, दि. २३ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत दादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, येत्या ६ मार्चला अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या अर्थसंकल्पासाठी प्रचंड तयारी केली होती. एक चांगला अर्थसंकल्प मांडण्याचा त्यांचा मानस होता. मात्र, दुर्दैवाने हा अर्थसंकल्प मांडण्याची वेळ माझ्यावर आली आहे. अजित पवार हे अर्थव्यवस्थेची शिस्त सातत्याने पाळायचे, असे त्यांनी सांगितले.



नुकत्याच केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला २ हजार कोटी रुपयांची अधिकची वाढ मिळाली आहे. तसेच कर वाटपातून ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळणार आहेत. केंद्रशासनाकडे राज्य शासनाने केलेली मागणी बहुतांशी मान्य केल्यामुळे महाराष्ट्राला चांगला फायदा होणार आहे. केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात आपल्याला दोन हायस्पिड कॉरिडॉर मिळाले आहेत. रेल्वेच्या अर्थसंकल्पातही आपल्याला २३ हजार कोटी रुपये मिळाले आहेत. गेल्या काही काळापासून केंद्र शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आपल्याला निधी मिळत आहे.व्हिबी जीरामजी या योजनेत आपण केलेली अधिक मनुष्यबळाची मागणी केंद्र शासनाने मान्य केली असून महाराष्ट्राला १३०० लाख मनुष्यबळ दिवसावरून १६०० लाख मनुष्यबळ दिवस वाढवून मिळाले आहेत. त्यामुळे जवळपास चौदाशे कोटी रुपये अतिरिक्त मिळणार असल्याचे श्री.फडणवीस यांनी सांगितले.

दावोस येथे ३० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांबाबत सभागृहात सविस्तर माहिती दिली जाईल. या संदर्भातील गैरसमज देखील दूर करण्यात येतील. 'इंडिया एआय समिट'मध्ये महाराष्ट्राचा सक्रिय सहभाग राहिला असून, शेती क्षेत्रासाठी 'एआय फॉर ग्रीकल्चर' ही आतंरराष्ट्रीय परिषद घेत असून इंडिया एआय समिटमध्ये त्यासंदर्भातील सॅटेलाईट सेशनही महाराष्ट्राला मिळाले आहे. या परिषदेत वेगवेगळे स्टार्टअप सहभागी झाले आहेत. देशातील पहिले ग्री एआय समिट म्हणून केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. दिवंगत अजित दादांनी त्यांच्या अर्थसंकल्पात एआय मिशनसाठी ५०० कोटींची तरतूद केली होती.

एआय मिशनअंतर्गत 'महाविस्तार' प विकसित करण्यात आले असून, राज्यातील ३० लाख शेतकरी त्याचा वापर करत आहेत. हवामान, पीकस्थिती, बाजारभाव यांची माहिती एका पवर उपलब्ध होणार आहे. या पमध्ये आता आदिवासी भिल्ली भाषेचाही समावेश करण्यात आला आहे. कृषी क्षेत्रात एआयच्या वापरामध्ये महाराष्ट्र पुढे जाणार आहे. एआयमुळे उत्पादन खर्च २५ ते ४० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो, असेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

चार आठवडे चालणाऱ्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात गोरगरीब व सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल. देशात सर्वाधिक दिवस चालणारे अधिवेशन हे महाराष्ट्र विधीमंडळाचे असल्याचा अभिमान आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशी करण्यात येणार आहे. डीजीसीआयने सुद्धा चौकशी सुरू केली आहे. व्हाईस रेकॉर्ड काढण्यासाठी परदेशातील कंपन्यांची मदत घेतली जाणार आहे. व्हीएसआर या कंपनीचे ऑडिट डीजीसीए करत आहे.

**पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे राज्याची सर्व क्षेत्रात प्रगती सुरू – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, दावोसमध्ये झालेले ३० लाख कोटींचे औद्योगिक करार त्यातून ४० ते ५० लाख रोजगारनिर्मितीचा होणार आहे. राज्यात पायाभूत सुविधांवर सुमारे एक लाख कोटी रुपयांची कामे सुरू आहेत.एमएमआरडीएच्या वतीने ४६ हजार कोटींच्या अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. मुंबईला वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी बीकेसी–कुर्ला टनेल, बोरिवली–ठाणे टनेल आणि मुलुंड टनेल प्रकल्प राबवले जात आहेत. त्यामुळे राज्याची सर्व क्षेत्रात प्रगती सुरू आहे.

एमएमआरडीएच्या कामांदरम्यान घडलेल्या दुर्घटनेबाबत बोलताना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून संबंधित कंपनीला ५ कोटी रुपये व सल्लागाराला १ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या प्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली असून सेफ्टी व स्ट्रक्चरल ऑडिटचे आदेश देण्यात आले आहेत. मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी व एमएमआरडीएमार्फत प्रत्येकी १५ लाख रुपयांची (पान २ वर...)

# आयडीएफसी फर्स्ट बँकेत ५९० कोटी रुपयांचा मोठा घोटाळा, कर्मचाऱ्यांनीच निधीचा केला अपहार, बँकिंग क्षेत्रात खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : चंदीगडमधील आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या एका प्रमुख शाखेत कोट्यवधी रुपयांचा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. बँकेने अधिकृतपणे कबूल केले आहे की या शाखेत ५९० कोटी रुपयांचा मोठा घोटाळा झाला आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे हा संपूर्ण आर्थिक घोटाळा थेट हरियाणा सरकारच्या खात्यांशी जोडलेला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ५९० कोटी रुपयांचा हा मोठा घोटाळा कोणत्याही तपास यंत्रणेने उघड केला नाही, तर एका सामान्य प्रक्रियेदरम्यान उघड झाला आहे.

आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या शाखेत ५९० कोटी रुपयांचा मोठा घोटाळा उघडकीस आल्यानंतर बँकिंग क्षेत्रात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासानुसार, काही बँक कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पदांचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणात अनधिकृत व्यवहार केले आहेत. या मोठ्या आर्थिक फसवणुकीच्या उघडकीस आल्यानंतर बँक प्रशासन अलर्ट झालं आहे. १८ फेब्रुवारी २०२६ पासून, हरियाणा सरकारशी संलग्न असलेल्या अनेक संस्थांनी चंदीगडमधील या बँकेच्या शाखेशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. त्यांचे प्राथमिक उद्दिष्ट त्यांचे अधिकृत खाते बंद करणे आणि तिथे जमा केलेले सर्व निधी दुसऱ्या बँकेत हस्तांतरित करणे हे होते. ही एक नियमित प्रक्रिया होती, परंतु कागदपत्रांची प्रक्रिया जसजशी पुढे सरकत गेली तसतसे एक मोठी तफावत दिसून आली. सरकारने नोंदवलेली शिल्लक आणि बँकेच्या प्रणालीतील प्रत्यक्ष शिल्लक यामध्ये एक महत्त्वाची तफावत आढळून आली. सुरक्षित मानले जाणारे पैसे तिथे नव्हते. कागदपत्रे आणि वास्तवातील या तफावतीमुळे घोटाळ्याची संपूर्ण व्याप्ती उघड झाली.

बँकेची कडक कारवाई, चार कर्मचाऱ्यांना केलं निलंबित

घोटाळ्याची माहिती मिळताच आयडीएफसी फर्स्ट बँकेचे व्यवस्थापन तात्काळ कारवाईत आले. या गंभीर प्रकरणाची प्राथमिक चौकशी म्हणून, चंदीगड शाखेतील चार संशयित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबन कायम राहील असे बँकेने जाहीर केले आहे. व्यवस्थापनाने असेही स्पष्ट केले आहे की या फसवणुकीत सहभागी असलेल्या कोणत्याही बँकेच्या कर्मचाऱ्यांना किंवा बाहेरील व्यक्तीला सोडले जाणार नाही. लागू कायद्यांनुसार त्यांच्याविरुद्ध कठोर शिस्तभंगाची, दिवाणी आणि फौजदारी कारवाई केली जाईल. स्थानिक पोलिस प्रशासनाकडे औपचारिक तक्रार देखील दाखल करण्यात आली आहे.

बँकेने इतर बँकांना देखील अलर्ट पाठवला

जिथे जिथे हे पैसे हस्तांतरित केले गेलेत तिथे बँकेने इतर बँकांना देखील अलर्ट पाठवला आहे. पुढील हस्तांतरण रोखण्यासाठी या संशयास्पद खात्यांमधील शिल्लक तात्काळ ताब्यात घेण्याची विनंती बँकेने केली आहे.

# अमरावतीच्या मेळघाटात भीषण अपघात, चार जणांचा जागीच मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अमरावती : अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. राणीगाव घाटामध्ये पिकअप वाहन पलटी झाल्यानं चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दहा ते बारा जण जखमी झाले आहेत. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने वाहन रिव्हर्समध्ये बाजूच्या ६० ते ७० फूट खोल दरीत कोसळल्याने हा भीषण अपघात झाला आहे. या अपघातामुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

धारणी पो स्टे हद्दीत धारणी पो स्टे पासून ३५ किलो मीटर अंतरावर राणीगांव कडे जाताना शिवाझरी ते राणीगांव दरम्यान बोलेरो पिकअप वाहणाच्या चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने वाहन रिव्हर्स मध्ये बाजूच्या ६० ते ७० फूट खोल दरीत कोसळले. वाहनात कंजोली आणि राणीगांव येथील १५ ते २० लोक होते. यापैकी घटनास्थळावरच ४ जणांचा (एक स्त्री व ३ पुरुष ) मृत्यू झाला असून ७ ते ८ व्यक्ती जखमी आहेत. सर्व मृतक कंजोली ता. धारणी येथील आहेत. हे लोक बाजाराकरिता देडतलाई मध्यप्रदेश येथे गेले होते. सर्व मृतदेह आणि जखमी उपचाराकरिता धारणी येथे रुग्णालयात रवाना करण्यात आले आहे. वाहनचालक फरार झालेला आहे.

**सरकारची भूमिका अत्यंत संदिग्ध**

**महाविकास आघाडीकडून जोरदार हल्लाबोल**

# महाविकास आघाडीचा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापानावर बहिष्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सत्ताधारी पक्ष म्हणून सत्ताधारी पक्षाचं वर्तन हे सभ्यतेचं असावं लागतं. परंतु, प्रचंड बहुमत मिळाल्यामुळं सत्ताधारी पक्ष हा मस्तीमध्ये आहे, एक प्रकारचा माज आल्यासारखा सत्ताधारी पक्षाचं वर्तन आहे. जिथं मान सन्मान नाही, जिथं सभ्यता नाही, जिथं लोकशाहीचा सन्मान नाही, जिथे घटनेबद्दल आदर नाही अशा ठिकाणी आम्ही चहापणाला जाणार नाही, असा हल्लाबोल करत महाविकास आघाडीने अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापानावर बहिष्कार टाकला.

महाविकास आघाडीकडून ठाकरे भास्कर जाधव, आमदार आदित्य ठाकरे, काँग्रेसकडून सतेज पाटील, विजय वडेट्टीवार आदी नेत्यांनी




अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर भूमिका स्पष्ट केली. एवढं बहुमत आणि बहुमताचं सरकार असताना विरोधी पक्ष नेत्याची एवढी भीती का असावी भाजपाला? भाजपाच्या मनात एवढी भीती का आहे? अशी विचारणा महाविकास आघाडीने केली.

दरम्यान, या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून एकही नेता उपस्थित नसल्याने भूवया उंचावल्या आहेत.

भास्कर जाधव म्हणाले की, अजित दादा पवार यांचा अपघात झाला की तो घातपात झाला अशी संपूर्ण महाराष्ट्राच्या मनामध्ये शंका असताना सरकारची भूमिका अत्यंत संदिग्ध आहे. डिजिटल मीटर आहेत, घरगुती वगैरे हे आम्ही जबरदस्तीने लावणार नाही म्हणतात आणि चार दिवसापूर्वीच मी मुख्यमंत्र्यांचं स्टेटमेंट ऐकलं की संपूर्ण देशामध्ये हे अशा पद्धतीचे अदानीचे डिजिटल मीटर लावणार हे देशातलं पहिलं एक नंबरच राज्य आहे म्हणून वरती छाती बडवतात, असा टोला लगावला. हे राज्य आता जवळजवळ उडता पंजाब होते की काय अशी भीती वाटायला लागली आहे. कारण ड्रग्ज या राज्यामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये विकलं जात असल्याचा आरोप भास्कर जाधव यांनी केला.

शेतकऱ्यांची लूट चालली

विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतकऱ्यांची लूट चालली असून सोयाबीनला ४ हजार रुपयांपलीकडे एक रुपया मिळाला नाही. मका १५००–१६०० रुपयाच्या पलीकडे व्यापाऱ्यांनी घेतला नाही महाराष्ट्रातील एका शेतकऱ्याला सावकारांच्या कर्जामुळं त्याला किडनी विकावी लागते, तो आमच्या चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी आहे. ९ लाख ३२ हजार कोटी रुपयाचं कर्ज राज्याच्या डोक्यावर आहे, लाडक्या बहिणींमुळे हे राज्य कर्जबाजारी होते असं सांगतात. लाडक्या बहिणीच्या नावाने देताय दीड (हजार) आणि कर्जबाजारी झालय म्हणून तुमचे मंत्री सांगतात, हे सगळं जे ढोंग असल्याची टीका त्यांनी केली.

कमिशनखोरी महाराष्ट्रामध्ये सरळ सरळ २०–२५ टक्क्यांवर जात असेल, टेंडरची किंमत दीडपट वाढवून पुन्हा ते टेंडर प्रकाशित होऊन एका विशिष्ट माणसाला दिलं जातं. महाराष्ट्रामध्ये बोली लागलेली आहे, तू १५ टक्के देतो काय? चल २२ टक्के फायनल तुला काम मिळालं, अशी स्थिती झाल्याची टीका त्यांनी केली. आज महाराष्ट्रामध्ये अशा १ लाख ५७ हजा महिला आणि मुली लापता आहेत, कुठे आहे महाराष्ट्र? अशी विचारणा त्यांनी केली.

आदित्य ठाकरे म्हणाले की, मुलुंडमध्ये मेट्रोचं चालू काम असतानाच एक रिक्षा चिरडली गेली, दोन व्यक्तींचा मृत्यू झाला. किंमत काय लागली पाच लाख, म्हणजे ही आपल्या आता जीवनाची किंमत आपल्या राज्यामध्ये झालेली आहे.

शहरी भागात नोकऱ्या नाहीत, जे कोणी नुसतं चालतात रस्त्यावर, त्याच्यावर इन्फ्रास्ट्रक्चरचं वजन पडतं आणि खालती चिरडले जातात, मग नेमकं हे राज्य चाललंय तरी कोणासाठी आणि कशासाठी? अशी विचारणा त्यांनी केली.

सतेज पाटील म्हणाले की, २०२५ चा आर्थिक इकॉनॉमिक सर्वे आलेला आहे, त्यामध्ये ७० लाख युवक आणि युवतींनी बेरोजगार म्हणून नोंद ऑनलाईन रजिस्टरमध्ये केली आहे.गरज नसलेला महामार्गाची ८६ हजार कोटींची व्हॅल्यू आज १ लाख २ हजार कोटींवर गेली आहे. १२ जिल्ह्यांमध्ये शक्तिपीठ महामार्गाला विरोध असल्याचे ते म्हणाले. मंत्रालयात एसीबी धाड घालते, हे वरचं अप्रूव्हल असल्याशिवाय शक्य नाही. मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे, राष्ट्रवादीला कॉर्नर करण्यासाठी ही धाड होती का? असा सवाल त्यांनी केला.

## संपादकीय....

# असंवैधानिक टॅरिफ

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाने यापूर्वी लागू केलेले टॅरिफ असंवैधानिक ठरवल्यानंतरही अवघ्या काही तासांमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १० टक्क्यांवरून १५ टक्के जागतिक टॅरिफ लागू केला आहे. अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, टॅरिफ ठरवण्याचा अधिकार अमेरिकन काँग्रेसचा आहे तो राष्ट्राध्यक्षांचा नाही. १५ टक्क्यांची ही वाढ '१९७४ च्या व्यापार कायद्याच्या कलम १२२' अंतर्गत करण्यात आली आहे. हे या कायद्यांतर्गत शक्य असलेले सर्वोच्च दर आहेत. कलम१२२ अंतर्गत लावलेले हे टॅरिफ १५० दिवसांच्या कालावधीसाठी मर्यादित आहेत, जोपर्यंत काँग्रेस त्यांना मुदतवाढ देत नाही. रॉयटर्सच्या वृत्तानुसार काही महत्त्वाची खनिजे, धातू आणि ऊर्जा उत्पादने यांना या टॅरिफमधून सवलत देण्यात आली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' प्लॅटफॉर्मवर आक्रमक भूमिका मांडली आहे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर त्यांनी हास्यास्पद, निकृष्ट भाषेत लिहिलेला आणि अत्यंत अमेरिकाविरोधी निर्णय असे संबोधले. बहुमताने निर्णय देणाऱ्या न्यायाधीशांना त्यांनी मूर्ख आणि पाळीव कुत्रे म्हटले असून ते त्यांच्या कुटुंबासाठी लाजीरवाणी गोष्ट असल्याचे म्हटले. दरम्यान, टॅरिफची वाढ तत्काळ प्रभावाने लागू केली असल्याचे जाहीर केले. या नवीन टॅरिफमुळे जागतिक स्तरावर खळबळ उडाली असून हाँगकाँगने या परिस्थितीला गोंधळ म्हटले आहे, तर जर्मनीने यावर युरोपीय देशांची एकत्रित भूमिका मांडण्याचे संकेत दिले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेले व्यापक आयात शुल्क (टॅरिफ) रद्द करण्याचा मोठा निर्णय अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाने म्हटले की, ट्रम्प प्रशासनाने राष्ट्रीय आणीबाणीच्या परिस्थितीसाठी असलेल्या कायद्याचा वापर करून हे टॅरिफ लावले, पण हा अधिकार राष्ट्राध्यक्षांच्या मर्यादेपलीकडचा आहे. अमेरिकेने भारतीय वस्तूंवर १५ टक्के टॅरिफ लावल्यास भारताच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होऊ शकतो. अमेरिका हा भारताचा प्रमुख निर्यात भागीदार असल्याने भारतीय उत्पादने अमेरिकन बाजारात महाग पडतील. त्यामुळे अमेरिकन आयातदार पर्यायी देशांकडे वळू शकतात आणि भारताची निर्यात घटू शकते. विशेषतः स्टील, औषधनिर्मिती, कापड आणि काही अभियांत्रिकी उत्पादने या क्षेत्रांना फटका बसण्याची शक्यता आहे.

# छत्रपतींचा विचार : स्वराज्याची जाणीव, जबाबदारीची प्रेरणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इतिहासातील काही व्यक्तिमत्त्वे केवळ एका काळापुरती मर्यादित राहत नाहीत; ती युगांना दिशा देतात, मनांना चेतना देतात आणि राष्ट्राच्या आत्म्यात कायमची घर करून राहतात. अशा तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, धैर्य, दूरदृष्टी आणि लोकाभिमुख राज्यकारभाराचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज. त्यांची जयंती हा केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो आत्मपरीक्षणाचा, प्रेरणा घेण्याचा आणि आजच्या भारताला आवश्यक असलेल्या मूल्यांची उजळणी करण्याचा दिवस आहे. शिवाजी महाराजांचा जन्म हा एका सामान्य घराण्यात झाला, पण त्यांच्या विचारांची आणि कर्तृत्वाची उंची असामान्य होती. त्यांनी पाहिलेला समाज गुलामीच्या सावटाखाली दबलेला होता. अन्याय, अत्याचार, भीती आणि असुरक्षितता हेच सामान्य माणसाचे वास्तव झाले होते. अशा वेळी स्वराज्याची संकल्पना मांडणे ही केवळ राजकीय बंडाची घोषणा नव्हती; ती माणसाच्या सन्मानासाठी उभी केलेली चळवळ होती. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हा त्यांचा विचार आजही प्रत्येक नागरिकाच्या मनात स्वाभिमानाचा दीप प्रज्वलित करतो.

शिवाजी महाराजांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी स्वराज्याची उभारणी तलवारीच्या जोरावरच केली नाही; तर लोकांच्या विश्वासावर केली. त्यांच्या सैन्यात सर्व जाती-धर्मातील माणसे होती. कर्तृत्व, निष्ठा आणि शौर्य यांना त्यांनी प्राधान्य दिले. समाजातील प्रत्येक घटकाला त्यांनी स्वराज्याच्या कार्यात सहभागी करून घेतले. त्यामुळे त्यांचे स्वराज्य हे केवळ राजकीय सत्ता नव्हते; ते लोकसहभागातून उभे राहिलेले लोकांचे राज्य होते. आजच्या काळात आपण लोकशाहीचे गोडवे गातो; पण लोकशाहीचा खरा आत्मा काय आहे, हे शिवाजी महाराजांच्या कार्यपद्धतीत स्पष्ट दिसते. त्यांनी प्रजेचे रक्षण हे राज्यकर्त्याचे सर्वोच्च कर्तव्य मानले. स्त्रियांच्या सन्मानाबाबत त्यांनी कठोर धोरण ठेवले. शत्रूच्या प्रदेशातही स्त्रियांवर किंवा निरपराध लोकांवर अन्याय होऊ नये, याची त्यांनी विशेष काळजी घेतली. युद्ध जिंकण्याइतकेच मानवता जपणे महत्त्वाचे आहे, हा संदेश त्यांनी आचरणातून दिला.





– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

शिवाजी महाराजांचे युद्धतंत्र हे केवळ शौर्यावर आधारित नव्हते; ते बुद्धिमत्ता, नियोजन आणि परिस्थितीचा अचूक अभ्यास यांवर आधारलेले होते. गनिमी कावा ही त्यांची रणनीती आजही व्यवस्थापनशास्त्रात अभ्यासली जाते. कमी संसाधनांत मोठे यश मिळवायचे असेल, तर नियोजन, वेग आणि अचूक अंमलबजावणी आवश्यक असते, हे त्यांनी दाखवून दिले. डोंगरकिल्ले, आरमार, गुप्तहेर व्यवस्था, दळणवळण यांची उभारणी करून त्यांनी एक सक्षम सुरक्षा यंत्रणा उभी केली. परंतु शिवाजी महाराजांचा वारसा फक्त युद्धकौशल्यापुरता मर्यादित ठेवणे ही मोठी चूक ठरेल. ते दूरदर्शी प्रशासक होते. महसूलव्यवस्था, न्यायदान, किल्ले व्यवस्थापन, व्यापारसंरक्षण, समुद्री सुरक्षा अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांचे हित जपले. पिकांची नासधूस होऊ नये म्हणून सैन्याला कडक सूचना दिल्या. कररचना सुबक आणि न्याय्य ठेवण्याचा प्रयत्न केला. राज्यकारभार हा प्रजेच्या कल्याणासाठी असतो, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले.

आज आपण विकास, सुशासन, पारदर्शकता याबद्दल बोलतो. पण या संकल्पनांची बीजे शिवकालीन राज्यव्यवस्थेत स्पष्ट दिसतात. भ्रष्टाचार, लाचलुचपत, सत्तेचा गैरवापर यांना त्यांनी कठोर विरोध केला. अधिकाराबरोबर जबाबदारी ही असलीच पाहिजे, हा संदेश त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिला. म्हणूनच त्यांचे प्रशासन जनतेला आपले वाटले. शिवाजी महाराजांची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे धार्मिक सहिष्णुता. त्यांनी कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही. त्यांच्या दरबारात विविध धर्मांचे लोक सन्मानाने वावरत होते. मंदिरांचे संरक्षण त्यांनी केले, तसेच मशिदींचा आदरही राखला. धर्माच्या नावावर माणसांमध्ये भिंती उभ्या करणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. न्याय आणि मानवता हेच त्यांच्या राज्यधर्माचे आधारस्तंभ होते.

आजच्या ध्रुवीकरणाच्या आणि तणावाच्या वातावरणात हा विचार अधिकच महत्त्वाचा ठरतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे समावेशकता, सन्मान आणि सहअस्तित्व. त्यांच्या नावाचा वापर जर फूट पाडण्यासाठी केला गेला, तर तो त्यांच्या विचारांचा अपमान ठरेल. त्यांची जयंती साजरी करताना हा आत्मा जपणे आवश्यक आहे. दुर्दैवाने, आज अनेकदा शिवाजी महाराजांचे नाव घोषणांमध्ये, राजकीय भाषणांत आणि सोशल मीडियातील वादांत जास्त दिसते; पण त्यांच्या विचारांचे अनुकरण व्यवहारात कमी दिसते. किल्ल्यांवर गर्दी होते, पण कर्तव्यभावनेची उणीव जाणवते. त्यांच्या प्रतिमांना हार अर्पण केले जातात, पण त्यांच्या तत्त्वांना कृतीत स्थान दिले जात नाही. हा विरोधाभास आपण ओळखला पाहिजे. शिवाजी महाराजांचा खरा सन्मान म्हणजे प्रामाणिकपणे काम करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, स्त्रीसन्मान जपणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे, आणि समाजहिताला प्राधान्य देणे. स्वराज्य ही केवळ ऐतिहासिक संकल्पना नाही; ती आजही जिवंत राहू शकते. जर प्रत्येक नागरिक जबाबदार बनला तर.

तरुण पिढीसाठी शिवाजी महाराज म्हणजे प्रेरणेचा अखंड झरा आहे. मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस, संकटात न खचता उभे राहण्याची ताकद, आणि अपयशातून शिकत पुढे जाण्याची वृत्ती त्यांनी दिली. परिस्थिती प्रतिकूल असली तरी इच्छाशक्ती आणि योग्य दिशा असेल, तर इतिहास घडवता येतो, हे त्यांनी सिद्ध केले. शिक्षण, उद्योग, शेती, विज्ञान, सामाजिक कार्य कोणतेही क्षेत्र असो, शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन मार्गदर्शक ठरू शकतो. समस्येकडे संधी म्हणून पाहणे, स्थानिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करणे, आणि लोकांना सोबत घेऊन पुढे जाणे, हे त्यांचे तत्त्व आजच्या विकासमंत्राशी सुसंगत आहे. शिवजयंती साजरी करताना ढोल-ताशांचा गजर, मिरवणुका, घोषणाबाजी यांना आपले स्थान आहे; पण त्यापलीकडे विचारांची मिरवणूक निघाली पाहिजे. प्रत्येक शाळेत, प्रत्येक घरात, प्रत्येक कार्यालयात त्यांच्या कार्यपद्धतीवर चर्चा झाली पाहिजे. मुलांना केवळ पराक्रमाच्या कथा नव्हे, तर मूल्यांची शिकवण दिली पाहिजे.

आपण स्वतःला एक प्रश्न विचारूया ! स्वराज्य म्हणजे नेमके काय? केवळ सत्ता बदलणे की व्यवस्था बदलणे? शिवाजी महाराजांनी व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न केला. भीतीच्या जागी विश्वास, अन्यायाच्या जागी न्याय आणि गुलामीच्या जागी स्वाभिमान निर्माण केला. हीच स्वराज्याची खरी व्याख्या आहे. आजच्या भारताला तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि पायाभूत सुविधा यांसोबतच नैतिक नेतृत्वाचीही गरज आहे. निर्णयक्षम, पारदर्शक आणि लोककेंद्रित नेतृत्व, हेच शिवाजी महाराजांचे खरे वारसत्व आहे. ते केवळ इतिहासातील राजा नव्हते; ते विचारांचे राज्यकर्ते होते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिमान व्यक्त करू नये, तर बांधिलकी व्यक्त करावी. प्रामाणिक नागरिक होण्याची, समाजहित जपण्याची आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची. कारण स्वराज्य टिकते ते किल्ल्यांमुळे नाही, तर कर्तव्यदक्ष माणसांमुळे. छत्रपतींची जयंती म्हणजे प्रेरणेचा दीप पुन्हा प्रज्वलित करण्याची संधी. तो दीप केवळ उत्सवापुरता न ठेवता, आपल्या आचरणात तेवत ठेवला तरच त्यांना खरी मानवंदना ठरेल. आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त सर्वांना स्वराज्य, शौर्य आणि स्वाभिमानाच्या प्रेरणादायी शुभेच्छा!

# 'महादृष्टी' प्रकल्पाला केंद्रीय वित्त मंत्रालयाची मंजुरी : मंत्री मंगलप्रभात लोढा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या छाननी समितीने कौशल्य विकास विभागाच्या महत्वाकांक्षी 'महादृष्टी' प्रकल्पाला मंजुरी दिली असून एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून सुमारे चार हजार कोटींचे अर्थसहाय्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे कौशल विकासात महाराष्ट्र घेणार उंच भरारी घेणार असून समाजातील दुर्बल घटकांनाही याच होणार लाभ असल्याचे कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.कौशल्य विकास विभागाच्या या कामगिरीबाबत समाधान व्यक्त करत मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, विकासाची दूरदृष्टी असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात युवकांना रोजगारक्षम बनविणे, उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ तयार करणे आणि कौशल्य प्रशिक्षण देऊन अधिक सक्षम करणे या दिशेने कौशल्य विभाग कार्यरत आहे. आशियायी बँकेकडून मिळणाऱ्या अर्थसाहाय्यामुळे आता ग्रामीण, दुर्गम भागातील कौशल्य विकास प्रशिक्षण अधिक अत्याधुनिक आणि दर्जेदार होणार आहे. यात महिलांसाठीही विशेष तरतूद करण्यात येणार असून यातून महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करता येणार आहे.

**दक्ष, पी एम सेतू आणि महादृष्टी प्रकल्पांमुळे चौफेर विकास**

महाराष्ट्र आर्थिक विकास परिषद केलेल्या शिफारशी नुसार राज्याच्या कौशल्य विकास विभागाने औद्योगिक प्रशिक्षण, संस्थांच्या पायाभूत सुविधा, प्रशिक्षण गुणवत्ता वाढीसंदर्भात मित्राच्या सहकार्याने एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या माध्यमातून केंद्राकडे यासंदर्भात अहवाल सादर केला होता. याला केंद्रीय छाननी समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार आता महादृष्टी प्रकल्पाद्वारे उद्योगांच्या मागणीनुसार देशी तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. एकीकडे दक्ष प्रकल्पाला जागतिक बँकेचे सहकार्य लाभले आहे. तसेच, पीएम सेतू योजनेचा ही महाराष्ट्राला लाभ होणार आहे. महादृष्टी हा प्रकल्प दोन्ही योजनांशी सुसंगत असणार असून या प्रकल्पातून उर्वरित राहिलेल्या घटकांना महादृष्टी प्रकल्पात समाविष्ट करण्यात येणार आहे. त्यामुळे या सर्व प्रकल्पांचा निधी सुनियोजितपणे कौशल्य विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी उपयोगात आणला जाणार आहे.

**कौशल्य परिसंस्थेला गती, रोजगारनिर्मितीला चालना**

राज्यातील कौशल्य विकास विभागाने विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम आणि उद्योग-संलग्न उपक्रमांच्या माध्यमातून राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. एशियन बँकेच्या सहकार्यामुळे यात आता मोठी भर पडणार आहे.

# शिवजयंती रॅलीत निफाड स्केटर्सचा सक्रिय सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरात विसा स्केंटींग अॅकॅडमीच्या स्केटरचा श्री छत्रपती शिवाजी महाराज शिवजयंती निमित्त भव्य रॉलीचे अयोजन करण्यात आले.होते उगावरोड येथील तुळजाभवानी मंदीर येथुन सुरु होईन शहरातील मुख्य मार्गक्रमण करत शांतीनगर चौफुली व निफाड येथील श्री छत्रपत्ती शिवाजी महाराज चौक येथे स्केटींग कौशल्याचे प्रदर्शन करीत हया चिमुकल्या स्केटर्सनी सर्वाचे ध्यान आकर्षित केले.



विसा स्केटींग अॅकॅडमीची स्केटर्स व कोच व मागदर्शक शाम चौधरी हयांच्या नेतृत्वात हया भव्य रॅलीत सहभागी झालीं होती.

श्री शिवाजी महाराज यांच्या पोशाखात शंभु कुंभार्डे, स्केटर अर्थव धारराव,कबीर साळवे,अनुज बागुल,तनिष भुतडा,रनविर चव्हाण,गुंजन संचेती,सिया संचेती,जयदत्त व्यवहारे,हया मुलानी सहभाग घेतला.

यशवी अयोजनासाठी बापु कुभार्डे, पांडु रंग धारराव, चेतन साळवे, अद्वेत चौधरी व पालक यांचे विशेष आभार मानण्यात आले.

# केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी स्वदेशी बनावटीच्या धनुर्वात आणि प्रौढ घटसर्प (टीडी) लसीचे केले उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कसौली : केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी आज हिमाचल प्रदेशातील कसौली येथील केंद्रीय संशोधन संस्थेत (सीआरआय) स्वदेशी बनावटीच्या धनुर्वात आणि प्रौढ घटसर्प (टीडी) लसीचे उद्घाटन केले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी कसौली येथील केंद्रीय संशोधन संस्थेचे (सीआरआय) शास्त्रज्ञ, तांत्रिक तज्ञ आणि कर्मचारी यांचे अभिनंदन केले. त्यांनी धनुर्वात आणि प्रौढ घटसर्प (टीडी) लसीच्या स्वदेशी प्रारंभाचे एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक प्रसंग म्हणून वर्णन केले. त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय आरोग्य सुरक्षा राखण्यासाठी आणि भारताच्या सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आरोग्य आणि औषधनिर्माण क्षेत्रात आत्मनिर्भरता साध्य करण्यासाठी स्पष्ट उद्दिष्टे सुनिश्चित केली आहेत हे मंत्र्यांनी अधोरेखित केले. स्वदेशी बनावटीच्या टीडी लसीचा प्रारंभ म्हणजे आरोग्य आणि औषध क्षेत्रात आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनाच्या दिशेने एक ठोस पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. टीडी लसीच्या औपचारिक प्रारंभासह, ही लस आता सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम (यूआयपी) अंतर्गत पुरवठ्यासाठी सादर करण्यात आली आहे. केंद्रीय संशोधन संस्था एप्रिल २०२६ पर्यंत सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाला ५५ लाख मात्रा पुरवेल, आणि पुढील वर्षांमध्ये उत्पादन हळूहळू वाढण्याची अपेक्षा आहे, जेणेकरून भारत सरकारचा सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम आणखी मजबूत होईल, असे ते म्हणाले.

भारताच्या जागतिक स्तरावरील स्थानावर प्रकाश टाकताना मंत्री म्हणाले की भारताला ''जगाची फार्मसी'' म्हणून व्यापकपणे ओळखले जाते. आपण जागतिक स्तरावर लस उत्पादकांमध्ये आघाडीवर आहोत. त्यांनी पुढे नमूद केले की भारताने जागतिक आरोग्य संघटनेच्या नियामक प्रणालींच्या जागतिक मानांकन यादीमध्ये परिपक्वता पातळी ३ गाठली आहे, जी लस नियामक चौकटीची मजबूती दर्शवते. सीआरआय सारख्या संस्थांनी ही मानके साध्य करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, असे त्यांनी नमूद केले. पूर्वी लस आणि औषधे विकसित करण्यास दीर्घ कालावधी लागत असे - जागतिक स्तरावर धनुर्वाताची लस विकसित करण्यासाठी दशकांचा कालावधी लागला होता, क्षयरोगावरील औषधे विकसित होण्यासाठी जवळजवळ ३० वर्षे लागली तर, जपानी मेंदूज्वरावर लस तयार करण्यासाठी जवळजवळ एक शतकभर वैज्ञानिकांचे प्रयत्न सुरू होते, याची केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी आठवण करून दिली. याउलट, कोविड-१९ साथीच्या काळात, भारतात नऊ महिन्यांत दोन स्वदेशी लसी विकसित केल्या गेल्या आणि बूस्टर डोससह या लसींच्या २२० कोटींहून अधिक मात्रा दिल्या गेल्या. कोविड-१९ लसीकरण प्रमाणपत्रे डिजिटल पद्धतीने वितरित केली गेली, यातून भारताच्या सार्वजनिक आरोग्य सेवेत झालेल्या डिजिटल परिवर्तनाचे दर्शन घडल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. भारताने जागतिक पातळीवर ऐक्यभाव दर्शवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा संदर्भ त्यांनी सांगितले की,लस मैत्री उपक्रमांतर्गत, भारताने जवळपास १०० देशांना लसी पुरवल्या, त्यापैकी ४८ देशांना लसी मोफत देण्यात आल्या. सीआरआयसारख्या सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांच्या योगदानामुळे देशांतर्गत आणि जागतिक गरजा पूर्ण करण्याची भारताची क्षमता बळकट झाली आहे, असे त्यांनी नमूद केले.

सीआरआय ही गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिस (जीएमपी) मानकांनुसार लसींचे उत्पादन करणारी पहिली सरकारी संस्था असून सार्वजनिक क्षेत्रातील लस उत्पादन कारखान्यांचे आधुनिकीकरण आणि पुनरुज्जीवनाचे होत असल्याचे तिच्यातून प्रतिबिंबित होते,असेही नड्डा यांनी स्पष्ट केले.

त्यांनी सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम अर्थात युनिव्हर्सल इम्युनायझेशन प्रोग्राम (यूआयपीचा) वर प्रकाश टाकत हा जगातील सर्वात मोठा लसीकरण कार्यक्रम असल्याचे नमूद केले. यूआयपीअंतर्गत सध्या ११ लसी दिल्या जात असून त्या लसींद्वारे प्रतिबंध करता येण्याजोग्या १२ आजारांपासून संरक्षण मिळत आहे, यामध्ये सीआरआयचे लक्षणीय योगदान आहे. दरवर्षी सुमारे २ ते २.५ कोटी मुले जन्माला येतात आणि तितक्याच संख्येने महिला गर्भवती होतात. गर्भधारणा झाल्याची नोंदणी झाल्यापासून, यू-विन सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे लाभार्थी मातांच्या आरोग्यावर लक्ष ठेवले जाते. गर्भवती मातांना पाचवेळा प्रसूतीपूर्व तपासणी करून घेता येईल याची सरकारकडून खबरदारी घेतली जात आहे, यामध्ये किमान एक वेळ तज्ञाकडून तपासणीचा समावेश आहे. लसीकरण आणि ट्रॅकिंग प्रक्रिया मूल १६ वर्षाचे होईपर्यंत सुरू राहते, यामध्ये कार्यक्रमांतर्गत दिल्या जाणाऱ्या २७ लसमात्रांचा समावेश आहे. वार्षिक लसीकरण गटात जवळपास २.५ कोटी गर्भवती महिला आणि २.५ कोटी मुले अशा सुमारे पाच कोटी लाभार्थ्यांचा समावेश आहे. पद्धतशीर ट्रॅकिंग आणि लसीकरणासाठी करण्यात येत असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे, देशात लसीकरण झालेल्यांचे प्रमाण जवळजवळ ९९ टक्क्यांवर पोहोचले आहे अशी माहिती मंत्री महोदयांनी दिली . हा भारताच्या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील परिवर्तनकारी बदल असल्याचे म्हणत, सीआरआय सारख्या संस्था यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचेही ते म्हणाले. आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा संदर्भ देत, मंत्री म्हणाले की ही जगातील सर्वात मोठी सार्वजनिक निधीतून चालणारी आरोग्य विमा योजना आहे. या योजनेचा लाभ ६२ कोटींहून अधिक लोकांना होतो. सामाजिक - आर्थिक निकषांची पर्वा न करता ७० वर्षावरील सर्व नागरिकांना या योजनेअंतर्गत दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य संरक्षण मिळवण्यासाठी पात्र मानले जाते.

## जनसामान्यांना दिलासा देणारा आणि आर्थिक शिस्त राखणारा अर्थसंकल्प सादर करण्याचा प्रयत्न करणार : मुख्यमंत्री फडणवीस

(पान १ वरून..) मदत देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सिंचन क्षेत्रात १२५ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे सांगत सुमारे ९० हजार कोटींची मंजुरी दिल्याचे त्यांनी नमूद केले. मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी तसेच विदर्भाला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पावले उचलली जात असल्याचे त्यांनी सांगितले. पोशिर, शिलार आणि काळू धरणांसाठीही निधी मंजूर केल्याचे त्यांनी जाहीर केले. शेतकऱ्यांसाठी ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केल्याचे सांगत एनडीआरएफचे निकष दोन हेक्टरवरून तीन हेक्टरपर्यंत वाढवले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्यांना मदत देण्यात आली असून दिवसा वीज पुरवठ्याचा निर्णयही शासनाने घेतल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणारा चहापान कार्यक्रम हा केवळ औपचारिक नसून संवादाचा प्रभावी मंच आहे. या माध्यमातून राज्याच्या विकासावर विधायक चर्चा होऊन जनतेचे प्रश्न मार्गी लागतात. या माध्यमातून जनतेने दिलेल्या विश्वासाला न्याय देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. दिवंगत अजित पवार यांनी ११ वेळा अर्थसंकल्प सादर करत राज्याच्या आर्थिक वाढीत मोलाचा वाटा उचलला आहे. विकास आणि आर्थिक शिस्त यांचा समतोल राखत महाराष्ट्राला सक्षम दिशा देण्याचे काम अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना केले.

यंदाचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री सादर करणार असून, राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा आणि सर्व घटकांना न्याय देणारा असेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला. आदरणीय अजित दादांनी अकरा वेळा राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. दिवंगत वानखेडे यांच्यानंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा मान त्यांना मिळाला, असेही त्यांनी यावेळी सांगितले. अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सह्याद्री अतिथीगृहात आयोजित चहापान कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत दादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य, विधीमंडळाचे सदस्य उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# आशियाई डॉजबॉल स्पर्धेत भारतीय संघाचा डंका

## महाराष्ट्राच्या ५ खेळाडूंचे चमकदार प्रदर्शन; प्रशिक्षक डॉ. हनुमंत लुंगे यांचा जळगाव येथे केंद्रीय क्रीडामंत्री रक्षाताई खडसे यांच्या हस्ते गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जळगाव/प्रतिनिधी : चिबा (जपान) येथे नुकत्याच पार पडलेल्या आशियाई आंतरराष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत भारतीय संघाने उत्कृष्ट कामगिरी करत देशाचे नाव उज्ज्वल केले. विशेष म्हणजे, या भारतीय संघात महाराष्ट्राच्या ५ दिग्गज खेळाडूंनी आपले कसब दाखवत राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या यशाचे शिल्पकार आणि 'महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशन'चे महासचिव प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांचा जळगाव येथे गौरव करण्यात आला.

**महाराष्ट्राचे 'पाच' शिलेदार**

भारतीय संघाचे नेतृत्व बीडच्या आशिष जगताप याने अत्यंत समर्थपणे केले. त्यांच्यासोबत संघात खालील खेळाडूंचा समावेश होता: आशिष जगताप (कर्णधार - बीड), शरद बडे (धाराशिव), विनायक सपकाळ (जळगाव), प्रतीक अलिबागकर (पुणे), प्रथमेश गायकवाड (पुणे)

आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या खेळाडूंच्या कामगिरीचे क्रीडा क्षेत्रातून कौतुक होत आहे.

**दिग्गजांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा**

या यशामागे खंबीर नेतृत्व आणि मार्गदर्शक म्हणून उभे राहिलेले शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांचा सत्कार आज, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी जळगाव येथे करण्यात आला. केंद्रीय क्रीडामंत्री माननीय नामदार श्रीमती रक्षाताई खडसे यांच्या शुभहस्ते हा सत्कार संपन्न झाला.

यावेळी व.उपाध्यक्ष श्री. राजेश जाधव, उपाध्यक्ष श्री. कैलास करवंदे, जळगाव जिल्हा सचिव श्री. योगेश सोनवणे, श्री. गिरीश पाटील, श्री. सचिन महाजन, श्री. अनिल चव्हाण आणि श्री. संकेत साळुंके यांनी खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दिलेले हे योगदान राज्यासाठी गौरवास्पद आहे. डॉ. हनुमंत लुंगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉजबॉल खेळ नवी उंची गाठत आहे, असे केंद्रीय क्रीडामंत्री रक्षाताई खडसे यांनी सांगितले.

या यशामुळे आगामी काळात महाराष्ट्रात डॉजबॉल खेळाला अधिक गती मिळेल, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.



# पोलीस कॉन्स्टेबल गणपतसिंग चव्हाण यांचे दुःखद निधन : नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने दिली मानवंदना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के.गायकवाड : वागदरी तालुका तुळजापूर येथील सुपुत्र व सध्या सोलापूर शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून सेवेत कार्यरत असलेले गणपतसिंग मोहनसिंग चव्हाण यांचे अल्पशा आजाराने दि.२१ फेब्रूवारी २२६ रोजी सायंकाळी ठिक ५. वा. दरम्यान वयाच्या ४३ व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे.

. गणपतसिंग चव्हाण हे महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती वागदरीचे माजी उपाध्यक्ष ज्येष्ठ कार्यकर्ते मोहनसिंग चव्हाण यांचे चिरंजीव होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत,गावातील मित्र परिवारासोबत गावात होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन सर्वांना हसत खेळत सर्वांसोबत खोड्या करत वाढलेलं हे व्यक्तिमत्व सतत मित्र परिवाराच्या घोळख्यात राहणारा व सर्वांना हवाहवासा वाटणारा मित्र सोलापूर पोलीस दलात भरती होतो आणि पोलीस दलाच्या माध्यमातून जनतेची सेवा करतो



याचा सार्थ अभिमान सर्व मित्रांना होता व आहे.जेंव्हा जेंव्हा गावातील व्यक्ती सोलापूरला गेल्यानंतर वेळ प्रसंगाला धावून येणारा आपला एक हक्काचा माणूस सोलापुरात आहे असं सर्वांना वाटणारं व्यक्तीमत्व म्हणजे गणपतसिंग चव्हाण..

त्यामुळे निर्भीड पणे सोलापूर सिटी मध्ये वावरण्याचे एक धाडस ग्रामीण भागातील मित्र परिवारांना यायचं. सर्व जाती धर्मातील जिवलग मित्रपरिवार त्यांनी निर्माण केला होता.

ते गेल्या काही दिवसापासून आजारी होते दवाखान्यात उपचार चालू असतानाच वयाच्या अवघ्या ४३ व्या वर्षी त्यांचं दुःखद निधन झालं ही घटनाच कोणालाही सहन न करणारी आहे.अत्यंत दुर्दैवी आणि दुःखद अशी ही घटना आहे.त्यांच्या जाण्याने एक अवलिया मित्र आपण गमावला, पोलीस दलातील एक धाडसी व्यक्तिमत्व असलेल्या मित्राला आपण पोरके झालो आहोत अशा भावपूर्ण शब्दात मित्रपरिवारानी त्याना श्रध्दांजली वाहीली. दि.२२ फेब्रुवारी २२६ रोजी वागदरी ता.तुळजापूर येथे कै.पो.काँ गणपतसिंग चव्हान यांच्या पार्थिवा देहावर अंतिम



संस्कार करण्यात आले.या प्रसंगी नळदुर्ग पोलीस ठाण्याले पोलीस निरिक्षक सचिन यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके यांनी आपल्या पोलीस पथकासह पुष्पचक्र वाहून मानवंदना दिली असून सहाश्रू नयनाने समुदायानी त्याना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या पश्चात आई,वडिल,पत्नी,दोन मुले, तिन भाऊ असा मोठा परिवार आहे.

# ८६ हजार एसटी कर्मचाऱ्यांवर सोमवारी होणार पैशांचा पाऊस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या तब्बल ८६ हजार कर्मचाऱ्यांसाठी एक अत्यंत दिलासा बातमी समोर आली आहे. गेल्या काही काळापासून प्रलंबित असलेल्या वेतन वाढीच्या थकबाकीच्या मार्ग आता मोकळा झाला असून, राज्य सरकारने १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यामुळे येथे सोमवार पर्यंत कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात वेतनाची थकीत हप्ते जमा होणार आहेत.

सरकारचा निर्णय आणि निधीची उपलब्धता

एस टी महामंडळाने राज्य सरकारकडे एकूण ३२५ कोटी ची मागणी केली होती. त्यापैकी शंभर कोटीचा निधी तातडीने देण्याची शासन निर्णय (नियमित करण्यात आला आहे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी या संदर्भात वित्त विभाग कडे पाठपुरावा केला होता. उर्वरित निधी ही लवकरच उपलब्ध करून दिला जाईल.




आंदोलन स्थगित करण्याचे आव्हान : वेतन वाढीच्या मागणीसाठी एसटी कामगार संघटनाने आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र सरकारने निधी जाहीर केल्यामुळे आता हे आंदोलन मागे घेण्याची विनंती महामंडळाकडून करण्यात आली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री सोबत झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार थकीत वेतन वाढ समान टप्प्यात देण्याची आश्वासन पूर्ण करण्याच्या दिशेने ही पहिली पाऊल मानले जात आहे.

# शिवजयंती निमित्त बोपगांव येथे ह. भ. प. स्वप्नील महाराज दौडकर यांचे कीर्तन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : डॉ. विनायक गायकवाड

बोपगांव येथे गेली सात वर्ष शिवस्वराज्य प्रतिष्ठान व समस्त ग्रामस्थ बोपगांव यांचे वतीने 'शिवजयंती' हा उपक्रम राबविला जात आहे. यावर्षीही पारंपरिक कनिफनाथ ढोल लेझीम पथक बोपगांव यांच्या गजरात व भारतीय संस्कृतीच्या वातावरणात छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिंहगड किल्ला येथून बोपगांव पर्यंत शिवज्योत दौड काढण्यात आली.




यावेळी कीर्तनकर ह. भ. प. स्वप्नील महाराज दौडकर म्हणाले, धर्म म्हणजे केवळ पूजा-अर्चा नव्हे, तर कर्तव्य, नैतिकता, समाजहिताची जाणीव आहे. शिवाजी महाराजांनी धर्माचे रक्षण करताना सर्व धर्मांना समान आदर दिला.

कीर्तनकर दौडकर यांनी शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या आणि दूरदृष्टीच्या अनेक कथा सांगितल्या. स्वराज्याची पायाभरणी यांसारख्या प्रसंगांचे वर्णन केले.

शिवरायांचे शौर्य, संघटन कौशल्य आणि प्रजेप्रती असलेले प्रेम यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाच्या शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आरती करण्यात आली.आरती नंतर उपस्थित सर्वांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.मोठ्या संख्येने महिला भगिनी तरुण हजर होते.

# विरोधकांनी सभागृहचे नियम तुडवले पायदळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/सोलापूर : सोलापूर महानगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा २० फेब्रुवारी रोजी महापालिकेतील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये स्वीकृत सदस्य, स्थायी समिती सदस्य,परिवहन समिती सदस्य निवडने यासह आणखीन दोन विषय सभागृहाच्या पटलावर होते अकरा वाजताची सभा अकरा वीसला सुरू झाली सभा सुरू करण्यावरून विरोधकांनी गोंधळ घालत नगर सचिवांना धारेवर धरले यानंतर लागलीच महापौर व सभागृह येथे सभागृहात दाखल होत सभा सुरू झाली सभा सुरू होताच प्रथम स्वीकृत सदस्य निवडीचा विषय घेण्यात आला यामध्ये भारतीय जनता पार्टी कडून नऊ सदस्य निवडणे अपेक्षित होते परंतु भाजपाकडून आठ सदस्यांच्या नावांची घोषणा केली व एक एम आय एम पक्षाचा स्वीकृत नगरसेवक घोषित करण्यात आला.

यानंतर १६ स्थायी समिती सदस्यांची नावे वाचण्यात आली. त्यामध्ये १४ भारतीय जनता पार्टी, एक शिवसेना व एक एम आय पक्षाचा असे सोळा सदस्य निवडण्यात आले परंतु विरोधकांनी स्वीकृत नगरसेवक नऊ निवडायचे आहेत परंतु भाजपाच्या वतीने आठच सदस्यांची नावे घोषित करण्यात आली या विषयाला धरून सभागृहात गोंधळ घालण्यास सुरुवात केली. यावर आयुक्तांनी खुलासा करताना हे अधिकार सभागृहास व महापौरांना आहेत महापौरांच्या अधिकारात त्यांनी एकच स्वीकृत सदस्य व परिवहन समिती सदस्य निवडीचा विषय तहकूब ठेवला आहे असे सांगितले तरी ही विरोधकांनी प्रसिद्धीच्या हव्यासापोटी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. विरोधकांनी जरूर गोंधळ घालावा पण गोंधळ घालताना सभागृहाचे पावित्र्य व सभागृहाच्या नियमांची पायमल्ली होणार नाही याची देखील दक्षता घेणे अपेक्षित असताना तसे विरोधकांकडून झाले नाही. या गोंधळातच महापौरांनी दुःखवट्याचा प्रस्ताव सादर करत सभा तहकूब केली. अशातही विरोधकांनी म्हणजे जेष्ठ नगरसेवक अमोल बापू शिंदे व चेतन नरोटे यांनी महापौरांच्या डायसवर जात गोंधळ घातला. हे सभा शास्त्राच्या नियमांची पायमल्ली आहे. ज्येष्ठ नगरसेवकच असे वागत असतील तर नवख्या नगरसेवकांनी त्यांच्याकडून काय आचरण करावे. स्वीकृत नगरसेवक निवडीवरून विरोधक प्रसिद्धीच्या हवास्यापोटी गोंधळ घालत आहेत.

हाच गोंधळ जर त्यांनी शहर विकासासाठी घातला असता तर शहरवासीयांनी त्यांचे अभिनंदन केले असते असा सूर महापालिका आवारात ऐकवयास मिळाला केवळ विरोधकांनी प्रसिद्धीसाठी केलेला हा स्टंट आहे हा स्टंट करताना सभागृहाची व सभा शास्त्रांच्या नियमांची पायमल्ली केली आहे हे मात्र नक्की.



**सभा शास्त्राचे नियम धाब्यावर बसवून महापौरांच्या डायस वर जाऊन गोंधळ घालणाऱ्या ज्येष्ठ नगरसेवक अमोलबापू शिंदे व चेतन नरोटे यांच्यावर होणार का कारवाई**

## १० जणांना 'समाजभूषण 'पुरस्कार प्रदान

# कौतुकाची थाप प्रगतीसाठी प्रेरणादायी : नरेंद्र काळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करणे हा उपक्रम कौतुकास्पद आहे. ही कौतुकाची पाठीवर दिलेली ताप प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरेल असा विश्वास महापालिकेतील सभागृह नितीन नरेंद्र काळे यांनी व्यक्त केला.

शनिवारी जुळे सोलापुरातील मांगल्य मंगल कार्यालय भंडारा कवठे विकास मंच आणि गुरु फॉर लाईफ फाउंडेशन, जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समाजभूषण पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. उद्योगपती श्री शैल्य बहिरगोंडे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य इकबाल तांबोळी (शैक्षणिक) नंदकुमार वारे (पत्रकारिता), कल्लाप्पा फुलारी (शैक्षणिक), सुनिता ढवळेश्वर (शैक्षणिक), हनुमंत पैलवान पुजारी (सामाजिक), हनुमंत दहिवडे (उद्योजक), चिदानंद कोटी ( कृषी), रवी




राठोड, (क्रीडा), राजश्री बहिरगोंडे (उद्योजक) आणि प्रकाश जाधव (आदर्श पालक) यांना सन्मानचिन्ह शाल श्रीफळ देऊन समाजभूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक भाषणातून ग्रुप वर लाईफ फाउंडेशनची संस्थापक अध्यक्ष लिंगराज विंचुरे यांनी पुरस्कार देण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. दैनिक संचार चे वरिष्ठ उपसंपादक प्रशांत जोशी यांचेही यावेळी भाषण झाले. पुरस्कार प्राप्त प्राचार्य इक्बाल तांबोळी, हनुमंत दहिवडे, राजश्री बहिरगोंडे, सुनिता ढवळेश्वर, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. भंडारकवटेचे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर, राज्य उत्पादन शुल्कचे सेवानिवृत्त अधीक्षक भीमाशंकर बिराजदार, माझी प्राचार्य रामचंद्र कुलकर्णी, मल्लिकार्जुन गुरव, उद्योगपती शशिकांत झेडमणी, हनुमंत बहिरगोंडे, शिवशंकर वठारे, डी डी पाटील सुरेश पाटील चेन्नई स्वामी, जलवादी, माय कुंभार, यावेळी उपस्थित होते व सूत्रसंचालन कविता स्वामी मनोरमा जर्मनी यांनी केले तर रामचंद्र कुलकर्णी यांनी आभार मानले.

# पळस फुलला सिमगा आला... कागद... कागद...!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी :

नुकताच हिवाळ संपून उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. होळी व धूलीवंदनादरम्यान पळस फुलांचा उपयोग ग्रामीण भागात मुले रंग तयार करण्यासाठी करतात.यावर्षी सर्वाधिक पळस फुलले आहेत. यंदा होळी येण्याआधीच पळस फुलला ग्रामीण भागात पहायला मिळतो. हे मन भारावून जाणारे दृष्य पाहून जो तो म्हणतोय, पळस फुलला सिमगा आला... कागद कागद.... ही म्हण तंतोतंत जुळली आहे.



रस्त्याच्या बाजूला लक्षवेधी पळस बाग फुलल्याचे चित्र ग्रामीण भागात सध्या पाहयला मिळत आहे.खेड्यांचा भाग म्हणजे फळा-फुलांच्या झाडांची भर पडली आहे. कुडूनिंब, संत्रा अशा अनेक वनस्पती बहुगुणी आहे. पळसाचा सुध्दा विविध गोष्टींचा उपयोग केला जातो. या वनस्पतीची खोडे, पाने, फुले, बिया, जाळण्यासाठी लाकडे आदी विविध उपयोग केला जातो.

आता सर्वत्र ठिकाणी हा पळस फुलून सर्वांचे लक्ष वेधत आहे. फुलांचा उपयोग रंगपंचमीला रंग तयार करण्यासाठी केला जातो. रंगपंचमीला गरीब घरातील मुले हा आयुर्वेदिक रंग खेळतात. तसेच पळसाच्या बिया जमा करुन आणि त्यांची विक्री करुन पोटाची खळगी भरतात. खोडापासून तेंदूपत्ता संकलनाचे पुळके बांधतात. तसेच पानापासून समारंभात पत्रावळी तयार करतात. पत्रावळ निर्मितीमुळे ग्रामीण भागात अनेकांना रोजगार मिळत असतो.

**बहुगुणी वनस्पती पळस : ग्रामीणात रोजगाराचे एक साधन**

यावर्षी पळस मोठ्या प्रमाणात फुलल्याचे बोलल्या जाते. ग्रामीण भागातील मुले पळसाच्या वृक्षाखाली मौज मस्ती करताना दिसतात. येरंडी बाराभाटी, बोळदे, कवठा, देवलगाव या परिसरात मोठ्या प्रमाणात पळसाची झाडे असून ती बहरल्याने या परिसराला मनमोहक स्वरुप प्राप्त झाले आहे.

# पंढरपुरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये विकास कामांचा धडाका

## मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते भुयारी गटार योजनेच्या कामाचे भूमिपूजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर /प्रतिनिधी

पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विकास कामांचा मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी आढावा घेऊन मागील काही दिवसांपासून प्रभागात विकास कामाचा धडाका लावल्याचे दिसून येत आहे. रविवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक १७ संतपेठ परिसरातील ड्रेनेज लाईन भुयारी गटार योजनेच्या कामाचा शुभारंभ मनसे नेते दिलीप धोत्रे, नगराध्यक्षा प्रणिता भालके, समाजसेवक नागेश यादव यांच्या हस्ते पार पडला.



याप्रसंगी नगरसेवक लोकेश यादव,समाजसेवक बाबा चव्हाण,महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, शहर संघटक गणेश पिंपळनेरकर, दत्ता थोरात, संतोष वाघमारे, लक्ष्मण रणदिवे, तेजस जाधव, योगेश रणदिवे, तुषार करजीगीकर यांच्यासह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नुकत्याच पार पडलेल्या पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत संतपेठ परिसरातील बहुचर्चित असलेला प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांनी मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून नगरसेविका माधुरीताई दिलीप धोत्रे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून दिल्याने प्रभागातील जनतेचा विश्वास कायम ठेवत दिलीप धोत्रे यांनी अनेक वर्षांपासून नागरी सुविधांपासून वंचित असलेल्या प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी निवडून गेल्यानंतर अवघ्या दहा दिवसातच प्रभागाच्या मध्यवर्ती ठिकाणी उघडण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन विकास कामांचा धडाका सुरू केला आहे.

याचबरोबर महापुरुषांच्या जयंती निमित्त राज्यातील नावाजलेल्या कलाकारांच्या उपस्थितीत विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून लोककलेच्या माध्यमातून मराठी संस्कृतीचे दर्शन घडवून दिल्याबद्दल परिसरातील नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# कळंब येथे शिवजयंती निमित्त महारक्तदान शिबिराचे आयोजन



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथे सकल मध्यवर्ती शिवजन्मोत्सव समितीने आयोजित केलेल्या महा रक्तदान शिबिरास अभूतपूर्व प्रतिसाद लाभला यात तब्बल ३०० शिवभक्तांनी रक्तदान केले.

**३०० रक्तदात्यांनी नोंदवला सहभाग**

सोहळ्याचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरास, नगराध्यक्षा सौ. सुनंदा शिवाजी कापसे, शिवसेना नेते अजित पिंगळे,नायब तहसीलदार गोपाळ तापडिया, डॉ.रमेश जाधवर,डॉ. अभिजित जाधवर , सतीश टोणगे,भैय्या बाविकर, बाळासाहेब धस, शितलकुमार घोंगडे यांनी शिबिरास भेट दिली. या शिबिरात सकाळी १० ते ५ या वेळेत रक्तदान करण्यासाठी मोठी गर्दी जमली होती.

संकलित झालेले रक्त चार, रक्तपेढ्यांना सुपूर्त करण्यात आले. यामध्ये भगवंत (बार्शी) , सह्याद्री (धाराशिव) , रेणुका (धाराशिव), बीड बँक यांचा समावेश आहे.हे शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रा. संजय घुले,अतुल गायकवाड, बाळासाहेब कथले,यश सुराणा, ओंकार कुलकर्णी,भाऊसाहेब शिंदे, पंकज कोटेचा, गजानन फाटक,प्रा. अरविंद शिंदे, राजेंद्र बिक्कड, गोविंद खंडेलवाल,अशोक फल्ले, प्रा. जगदीश, गवळी, अँड शकुतला फाटक,मनोज चोंदे,प्रकाश खामकर, नवनाथ पुरी, मनोज फल्ले, संकेत भोरे, धर्मराज पुरी,रोहित किरवे, राहुल किरवे, विश्वजीत पुरी आदींनी परिश्रम घेतले.

# स्वेरीमध्ये 'आरोग्य तपासणी शिबिर' संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये 'राष्ट्रीय सेवा योजना' विभाग व महाविद्यालयाच्या 'माजी विद्यार्थी संघटने'च्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीच्या निमित्ताने स्वेरीतील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 'आरोग्य तपासणी शिबिरा'चे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**'रासेयो' व 'माजी विद्यार्थी संघटने'चा स्तुत्य उपक्रम**

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली हे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. सोलापूरच्या वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्रा.डॉ चंद्रकांत चव्हाण यांच्या हस्ते व पाहुण्यांच्या उपस्थितीत या शिबिराचे उदघाटन करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूरच्या वतीने हे शिबिर आयोजित केले होते. रुग्णालयाचे प्रतिनिधी सुधीर भातलवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयातील इतर सहकाऱ्यांच्या मदतीने हे शिबीर घेण्यात आले. या तपासणीमध्ये लिपिड प्रोफाइल, एलएफटी केएफटी, शुगर, सीबीसी, एचबी, एसी, कॅल्शियम, युरिक ॲसिड, प्रोटीन्स, आर ए, थायरॉईड चाचणी, आरोग्य तपासणी आदी तपासण्या करण्यात आल्या. प्रत्येक व्यक्तीच्या पाच टेस्ट करण्यात आल्या.

या आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ महाविद्यालयातील जवळपास ७५ प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतला. या उपक्रमामुळे सहभागी व्यक्तींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास व प्रतिबंधात्मक आरोग्य उपायांची जाणीव वाढण्यास मोलाची मदत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, प्रा. अविनाश मोटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, प्राध्यापकवर्ग तसेच सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे पंढरपूर विभागीय समन्वयक डॉ. संजय मुजमुले, सचिव डॉ. सुरज रोंगेच माजी विद्यार्थी संघटनेचे प्रतिनिधी दत्तात्रय घोडके, विद्यार्थिनी मृणालिनी सावंत व प्राध्यापकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खेडलेझुंगे गुरुकुलच्या विद्यार्थ्यांची मेंढी येथिल व्यसनमुक्ती केंद्राला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील खेडले झुंगे येथील योगीराज तुकाराम बाबा गुरुकुल शाळेच्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी नवोदय व्यसनमुक्ती केंद्र, मेंढी येथे शैक्षणिक क्षेत्रभेट दिली असून या क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देणे हा होता.

सदर केंद्रात मानसिक आरोग्य समस्यांनी ग्रस्त सुमारे ३५ रुग्णांची जबाबदारी संचालक मधुकर केरू गिते व त्यांचे पूर्ण कुटुंबीय घेत आहे.



व्यसनाधीन झालेल्या रुग्णांना इथे भरती करून त्यांच्यावर उपचार केले जातात. सर्व व्यसनाधीन रुग्णांना वेगवेगळी जबाबदारी वाटून दिली जात असून इथे सर्वांना स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा शिकवली जाते . रुग्णांना इथे औषधोपचार,योग-व्यायाम, समुपदेशन, प्रेरणादायी विचार आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून रुग्णांना नवजीवन देण्याचे कार्य सातत्याने केले जाते. इथे सर्वजण दैनंदिन जीवनातील कामे स्वावलंबीपणे करत असतात.

या केंद्रात १३-१४ वर्षांपासून ते ५०-६० वर्षांपर्यंत वय असलेले विविध वयोगटातील १०९ रुग्ण व्यसनमुक्तीच्या प्रक्रियेत असलेले रुग्ण उपचारासाठी दाखल आहेत.

यावेळी विद्यार्थिनी पुनम रुकारी हिने मनोगत व्यक्त करताना व्यसन म्हणजे फक्त दारू, सिगारेट किंवा गांजा नव्हे; मोबाईलचा अति वापरही व्यसनच आहे, असे सांगून विद्यार्थ्यांना सावध केले.

कार्यक्रमास पत्रकार मुकुंद आव्हाड, लेबर कॉन्ट्रॅक्टर गामणे साहेब, केंद्राचे संचालक माई-अण्णा व त्यांचे कुटुंब तसेच शाळेचा संपूर्ण स्टाफ उपस्थित होता. याप्रसंगी रविंद्र गोरडे विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे व्यसन आयुष्यात कधीही न करण्याची शपथ दिली. तसेच नवोदय व्यसनमुक्ती परिवाराचे आभार मानले.

याप्रसंगी पत्रकार मुकुंदा आव्हाड यांनीही उपक्रमाचे कौतुक करून व्यसनाधीनता हा ही खूप मोठी समस्या आहे, हे सर्वांच्या नजरेसमोर आणले व असे उपक्रम प्रत्यक्ष शाळेने राबवले पाहिजे असे मत व्यक्त केले. तसेच नवोदय व्यसनमुक्ती केंद्र तर्फे सर्व विद्यार्थ्यांना गोड शिरा वाटप करण्यात आले.

लहान वयात योग्य जाणीव झाली तर भविष्यातील मोठ्या चुका टाळता येतात. व्यसनामुळे कुटुंब संस्था व समाजजीवन कसे उद्ध्वस्त होते, याचे वास्तव चित्र विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहिले. या अनुभवातून विद्यार्थ्यांच्या मनात व्यसनाविषयी तिटकारा निर्माण होऊन* ते आयुष्यभर व्यसनमुक्त राहतील , असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.



**आरोग्य मंत्री श्री प्रकाश आबिटकर साहेब व मा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकार करताना आनंदी क्षण**

मुंबई येथे आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनाद्वारा भक्ती विठोबाची सेवा आरोग्याची अंतर्गतदिला जाणारा उत्कृष्ट आरोग्य सेवेचा पुरस्कार पंढरपूर तालुक्यास प्राप्त झाला. हा पुरस्कार आरोग्यमंत्री मा.ना. श्री प्रकाशजी अबीटकरसाहेब यांच्या शुभहस्ते स्वीकारताना तालुका आरोग्य अधिकारी माननीय डॉ एकनाथजी बोधलेसो, माननीय सिव्हिल सर्जन डॉक्टर डोईफोडे मॅडम, माननीय डॉक्टर महेश सुडके सर , माननीय डॉक्टर विजयकुमार सरडे सर .....

यावेळी आरोग्य राज्यमंत्री मा. ना. बोर्डीकर मॅडम सचिव आयुक्त संचालक व अधिकारी वर्ग उपस्थित होता.

# खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नातून माचणूरच्या प्राचीन श्री सिद्धेश्वर मंदिरासाठी ५ कोटी चार लाखांचा निधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील माचनूर येथील प्राचीन श्री सिद्धेश्वर मंदिराच्या संवर्धना व विकासासाठी उजनी जल पर्यटन अंतर्गत पाच कोटी चार लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे खासदार प्रणिती शिंदे यांनी सातारा डिसेंबर २०२५ रोजी पाठवलेल्या पत्रावर या प्रकरणात गती मिळाली व जिल्हा नियोजन समितीने निर्णय मान्यता दिली असून सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय कडे सादर करण्यात आला आहे त्यास संवर्धनाच्या दृष्टीने हा निर्णय धोरणात्मक मानला जात आहे.



मंदिराच्या संरक्षणासाठी भारतीय पुरातन सर्वेक्षण( ए एस आय) मुंबई मंडळाने सिव्हिल डिपॉझिट अंतर्गत सविस्तर प्रस्ताव सादर केला आहे संरक्षित स्मारकाच्या जतनासाठी एएसआयची पुनर्वसनाची परवानगी आवश्यक असून प्रास्ताविक विकासामुळे संरक्षित क्षेत्रावर कोणत्याही प्रतिकूल परिणाम होणार नाही याची खात्री केल्यानंतर अंतिम मंजुरी दिली जाते मंजुरी निधी एस आईकडे मंजूर झाल्यानंतर अन्यायानुसार संवर्धन व जीर्णोद्धार प्रक्रिया सुरू होणार आहे.

राज्य शासनाच्या विभागणी विकास कामे हाती घ्यायची असल्यास ए एम ए एस आय आर कायदा अंतर्गत सायन पूर्व मुंबई येथील प्रादेशिक संचालक एएसआय यांच्याकडे प्रस्ताव सादर करणे बंदर कारक असल्याची पत्रात नमूद केले आहे.

दरम्यान खासदार प्रणिती शिंदे मंदिराज प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केल्या देवस्थान समिती सोबत चर्चा करताना विकास कामांमध्ये दर्जा, पारदर्शकता आणि वेळेचे पालन यावर विशेष भर देण्याची आव्हान त्यांनी केले आवश्यक अतिरिक्त कामाबाबत ही सूचना करण्यात सांगितले.

या निर्णयामुळे मातृच्या ऐतिहासिक मंदिराच्या जतनाला गती मिळाल्या सोबत धार्मिक पर्यटनालाही चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे देवस्थान कमिटी व पंचक्रोशीतील नागरिकांनी खासदार पणेती शिंदे यांचे अभिनंदन करून कोट्यात नेता व्यक्त केली.

**चिखला काकड : छत्रपती शिवाजी महाराज पुतळा प्रकरण**

# नेत्याच्या विखारी भूमिकेमुळे शिवसेना महिला आघाडी तालुका प्रमुखांचा राजीनामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेडराजा:- नजीकच्या चिखला काकड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा प्रकरणी माजी आमदार यांच्या भूमिकेला लक्ष करीत शिवसेना शिंदे गटाच्या महिला आघाडी तालुका प्रमुख असलेल्या सौ. जयश्री दीपक कायंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा सरळसरळ माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठविला आहे. या राजीनाम्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासंदर्भात चिखला काकड, ता. लोणार येथील प्रकरणामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे.

याच पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे नेते व माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर यांच्या जातीयवादी विखारी भूमिकेमुळे अस्वस्थ झाल्याचे राजीनामा पत्रात विदित करीत सौ. जयश्री दीपक कायंदे यांनी राजीनामा मंजूर करुन आपला श्वास मोकळा करण्याचे राजीनामा पत्र माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठविले आहे.

ह्या राजीनामा पत्रात पुढे म्हटले आहे की, शिवसेनेचे संस्थापक माननीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचार प्रवाहित करण्याचे काम शिवसेनेतील नेते, पदाधिकारी व शिवसैनिक यांनी मिळून केले पाहिजे.

परंतु शिवसेनेचे नेते व सिंदखेडराजा मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर यांनी वंजारी समाजाला लक्ष्य (टारगेट) केले आहे. त्यामागे चिखला काकड येथील घटनेची कुठलीही शहानिशा केली नाही. कोणत्याही प्रकारची न्याय भूमिका ठेवली नाही, तर मनात आकसभाव सरळसरळ एक बाजू लावून धरली आहे.



सौ. जयश्री दीपक कायंदे ह्या ज्या समाजातून येतात त्याबद्दल तिरस्काराची भूमिका ठेवली आहे, असा आरोप पत्रात आहे. अशा व्यक्तींच्या नेतृत्वाखाली काम करणे नक्कीच चुकीचे आहे.

ह्या सगळ्या प्रकरणामुळे व सामाजिक भावनेचा आदर करीत आपण आपल्या पदाचा राजीनामा देत असल्याचे पत्रात शेवटी नमूद केले आहे. तर माझा राजीनामा मंजूर करुन आपल्याला श्वास मोकळा करुन देण्यात यावा अशी विनंती देखील करण्यात आली आहे.

मागील काळात अनेक प्रलोभने धुडकावून लावत, शिवसेना व नेते तथा माजी आमदार डॉ. यांच्याशी कायमस्वरुपी एकनिष्ठ राहिलेल्या सौ. जयश्री दीपक कायंदे ह्यांच्या राजीनाम्यामुळे राजकीय, सामाजिक आदि क्षेत्रात खळबळ उडाली आहे, एवढे मात्र निश्चित ..!